# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

## Maharashtra Industrial Development Corporation

**(A Government of Maharashtra Undertaking)**

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. प्रिन्सिपल कार्यालय : ४,४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५.

Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093. ☏:०२२-४७४८४३१२/४७४८४६७९/९९

Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005. ☏:+९१-२२-४०१६१४५१/५४

www.midcindia.org


क्रमांक: मऔविम/भूविभाग/मव्य(भूमी)/ P142365 दिनांक: 14/10/XXIV

विषय: भूखंड / शेड / गाळा वाटप व हस्तांतर इत्यादी बाबत अधिकारांमध्ये सुसुत्रता आणणे.

संदर्भ: १) परिपत्रक क्र मऔविम/भूविभाग/डी१४५०२ दिनांक २६.०९.२०१६.
२) परिपत्रक क्र मऔविम/भूविभाग/ई०३२११, दिनांक ०६.१२.२०२२.
३) परिपत्रक क्र मऔविम/भूविभाग/ई०९६२३, दिनांक २०.०६.२०२३.
४) शुध्दीपत्रक क्र मऔविम/भूविभाग/पी३४४३९, दिनांक २१.०६.२०२३.
५) शुध्दीपत्रक क्र मऔविम/भूविभाग/पी८८८६०, दिनांक २६.०९.२०२३.
६) परिपत्रक क्र मऔविम/भूविभाग/पी५५६७४, दिनांक ०१.१२.२०२३.

महामंडळाने विकसीत केलेल्या औद्योगिक क्षेत्रामधील आरेखीत भूखंडाचे वाटप MIDC Disposal of Land Regulations, १९७५ मधील तरतुदीप्रमाणे तसेच महामंडळाच्या सदस्य मंडळाच्या बैठकीत वेळोवेळी ठरावाद्वारे घेतलेल्या निर्णयानुसार / प्रशासकीय निर्णयानुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे करण्यात येते. संदर्भिय परिपत्रक/ शुध्दीपत्रकानुसार भूखंड/ शेड/ गाळा यांचे वाटप, हस्तांतरण व इतर प्राप्त प्रस्तावावर निर्णय घेणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या प्रादेशिक अधिकारी/ उप मुख्य कार्यकारी अधिकारी/ सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावरील भूखंड वाटप समित्यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. तथापि, सदर अधिकारांमध्ये बदल करणे आवश्यक असल्याने महामंडळाचे **संदर्भांकित परिपत्रक क्रमांक १ मधील मुद्दा क्रमांक ५ मध्ये** भूखंड वाटप समितीच्या अधिकारासंदर्भांत खालीलप्रमाणे

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

सुधारणा करण्यात येत आहे. तसेच, संदर्भ क्रमांक २, ३, ४, ५ व ६ वरील परिपत्रके (दिनांक ०६.१२.२०२३, २०.०६.२०२३, २१.०६.२०२३, २६.०९.२०२३ व ०१.१२.२०२३) या परिपत्रकाद्वारे अधिक्रमित / रद्द करण्यात येत आहेत.

५. भूखंड वाटप समितीचे अधिकार

भूखंड/शेड/गाळा वाटप करण्यासाठी भूखंड वाटप समित्यांना पुढील प्रमाणे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | | | कामकाज विषय | अधिकार प्रदान केलेली समिती / अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | २ | ३ |
| ५.१ | भूखंड/शेड/गाळा वाटप | | | |
| | १) | औद्योगिक भूखंडाचे वाटप करणे (ठाणे, रायगड व पुणे जिल्हा वगळून) | | |
| | | अ) | ८,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत भूखंडाचे वाटप करणे. तसेच, MSME उद्योजकांना २,५०० चौ.मी. पर्यंत भूखंड वाटप करणे. | प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | | आ) | ८,००१ चौ.मी. ते २०,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडाचे वाटप करणे. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | | इ) | २०,००१ चौ.मी. व त्यावरील क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप करणे. | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | | ई) | माहिती व तंत्रज्ञान / जैव तंत्रज्ञान उद्यानातील बिल्ट-अप गाळे इत्यादिंचे वाटप करणे | संबंधित सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | २) | ठाणे, रायगड व पुणे जिल्ह्यांतर्गत येणा-या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडांचे वाटप करणे | | |
| | | अ) | २,५०० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत भूखंडाचे वाटप करणे. तसेच, MSME उद्योजकांना २,५०० चौ.मी. पर्यंत भूखंड वाटप करणे. | प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | | आ) | २,५०१ चौ.मी. ते ४,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडाचे वाटप करणे. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | इ) | ४,००१ चौ.मी. व त्यावरील क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप करणे. | | मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| | ई) | माहिती व तंत्रज्ञान / जैव तंत्रज्ञान उद्यानातील बिल्ट-अप गाळे इत्यादिंचे वाटप करणे | | मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| ३) | <u>व्यापारी भूखंड / व्यापारी गाळ्यांचे वाटप करणे</u> | | | सर्व व्यापारी भूखंड/गाळे ई निविदा पध्दतीने. |
| ४) | <u>निवासी भूखंडाचे वाटप करणे.</u> | | | सर्व निवासी भूखंड (महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या मागणी व्यतिरीक्त) ई निविदा पध्दतीने. |
| ५) | <u>बिल्टअप शेड / गाळे वाटप करणे</u> | | | |
| | अ) | १,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत बिल्टअप शेडचे वाटप करणे, तसेच १,००० चौ.मी. पर्यंत बिल्टअप एरियाचे गाळे वाटप करणे. | | प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | आ) | १,००१ चौ.मी. ते २,००० चौ.मी. पर्यंत क्षेत्रफळाचे बिल्टअप शेडचे वाटप करणे. तसेच १,००१ ते २,००० चौ.मी. पर्यंत बिल्टअप एरियाचे गाळे वाटप करणे. | | उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | इ) | २००१ चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे बिल्टअप शेडचे वाटप करणे, तसेच २००१ चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे बिल्टअप एरियाचे गाळे वाटप करणे. | | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| ६) | अ) | <u>नियोजनानुसार वाटपास उपलब्ध असलेले आरेखीत भूखंड उद्योग विस्ताराकरिता वाटप करणे</u> | | |
| | | १) | २,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत भूखंडाचे वाटप करणे (अ, ब आणि पीएमआर विभागातील औद्योगिक क्षेत्रे वगळून) | संबंधित सह मुकाअ यांचे पूर्वमान्यतेने प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती |
| | | २) | २००१ चौ.मी. ते ५००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडाचे वाटप करणे (अ, ब आणि पीएमआर विभागातील औद्योगिक क्षेत्रे वगळून) | संबंधित सह मुकाअ यांचे पूर्वमान्यतेने उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | | ३) | क, ड आणि ड+ विभागामधील औद्योगिक क्षेत्रातील ५,००१ चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप करणे. | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ४) | अ, ब आणि पीएमआर विभागातील औद्योगिक क्षेत्रातील सर्व क्षेत्रफळाचे भूखंड वाटप करणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| | | आ) | | **मोकळया (Open Space)/ सुविधा (Amenity)/ भूखंड पाडण्यायोग्य क्षेत्रामधुन (Plottable Land) औद्योगिक प्रयोजनात रुपांतर करुन रुपांतरीत जागेचे उद्योग विस्तारासाठी वाटप करणे.** | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | ७) | **सोयी-सुविधा तसेच दिनांक ०९.०२.२०१०] १५.०३.२०२४ व १३.०८.२०२४ च्या परिपत्रकानुसार सवलतीच्या दराने भूखंडाचे वाटप करणे.** | | | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सोपविण्यात आलेल्या कार्यभारानुसार. |
| | ८) | अ) | | प्रकल्पग्रस्त / अपंग सदराखाली १०० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडाचे वाटप करणे तसेच प्रकल्पग्रस्तांना १५ टक्के परतावा जमिनीचे वाटप करणे. | प्रादेशिक अधिकारी |
| | | आ) | | प्रकल्पग्रस्तांच्या गटाने स्थापन केलेल्या JVC/ Partnership Firm ला भूखंडाचे वाटप करणे. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | ९) | **प्राधान्य सदराखाली सर्व प्रकारच्या भूखंडाचे वाटप करणे.** (उदा. शासन मान्यताप्राप्त विशाल, अतिविशाल व मोठे प्रकल्प, परकीय गुंतवणूक आणणारे उद्योजक, संरक्षण विभागाकरिता यंत्रसामुग्री पुरविणारे उद्योजक, फॉर्च्युन ग्लोबल-५०० / २००० व इकॉनॉमिक टाईम्स-२०० / ५०० कंपन्या, नैसर्गिक वायुचे द्रवरुप (LNG) किंवा विविध दाबाखाली (PNG) वाहिकेद्वारे वहन / दाब वाढविणे / साठवणूक / वितरण करणारे उद्योजक, महाराष्ट्र व केंद्र सरकारचे उपक्रम (PSU) तसेच इतर राज्याचे शासकीय उपक्रम, सुक्ष्म लघु उपक्रम-औद्योगिक समुह विकास योजना (MSE-CDP) अंतर्गत मान्यताप्राप्त औद्योगिक समुहांच्या सामाईक सुविधा केंद्रांना (CFC), अवकाश संशोधनासाठी यंत्रसामुग्री बनविणारे उद्योजक, आर्थिकदृष्ट्या अविकसीत क्षेत्रातील छोटे उद्योजक तसेच शेतकरी कंपन्या, इत्यादि) | | | |
| | | अ) | | ८,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत भूखंडाचे वाटप करणे | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सोपविण्यात आलेल्या कार्यभारानुसार. |
| | | आ) | | ८,००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप करणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी |

midcconsultants.in



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १०) | निविदाद्वारे भूखंडाचे वाटप करणे (औद्योगिक, निवासी, व्यापारी इत्यादि) | | मु. का. अ. यांच्या मान्यतेने म.व्य. (भूमी) विभागामार्फत निविदा काढाव्यात. सदरहू निविदा संबंधित उप मु.का.अ. यांच्या समितीमार्फत उघडण्यात येवून त्यांचा अहवाल मु.ले.अ. यांच्यामार्फत मु. का. अ. यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर, मान्यतेनुसार भुखंडाचे वाटप प्रादेशिक स्तरावर करण्यात यावे. |
| | ११) | <u>वृक्षारोपण/बागबगीचा/सुशोभिकरणासाठी जागा वाटप करणे.</u> | | |
| | | अ) | ४,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत भूखंडाचे वाटप करणे. | प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भुखंड वाटप समिती. |
| | | आ) | ४,००१ चौ.मी. ते ६,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भुखंडाचे वाटप करणे. | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भुखंड वाटप समिती. |
| | | इ) | ६,००१ चौ.मी. व त्यावरील क्षेत्रफळाच्या भुखंडाचे वाटप करणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| ५.२ | <u>भूखंड/शेड/गाळा हस्तांतरण करण्यास प्राधिकृत करण्यात आलेले अधिकार</u> | | | |
| | १) | <u>औद्योगिक भुखंड हस्तांतरण करणे</u> | | |
| | | अ) | ५,०००चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत भुखंडाचे हस्तांतरण करणे. | प्रादेशिक अधिकारी. |
| | | आ) | ५,००१चौ.मी. ते १०,०००चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भुखंडाचे हस्तांतरण करणे. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| | | इ) | १०,००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या भूखंडाचे हस्तांतरण करणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | | ई) | सोई-सुविधा, सवलतीच्या दराने तसेच प्राधान्य सदराखाली वाटप केलेल्या सर्व प्रकारच्या व क्षेत्रफळाच्या भुखंडाचे हस्तांतरण करणे (उदा. शासन मान्यताप्राप्त विशाल, अतिविशाल व मोठे प्रकल्प, परकीय गुंतवणूक आणणारे उद्योजक, संरक्षण विभागाकरिता यंत्रसामुग्री पुरविणारे उद्योजक, फॉर्च्युन ग्लोबल-५०० / २००० व इकॉनॉमिक टाईम्स-२०० / ५०० कंपन्या, नैसर्गिक वायुचे द्रवरुप (LNG) किंवा विविध दाबाखाली (PNG) वाहिकेद्वारे वहन / दाब | मुख्य कार्यकारी अधिकारी |



midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | वाढविणे / साठवणूक / वितरण करणारे उद्योजक, महाराष्ट्र व केंद्र सरकारचे उपक्रम (PSU) तसेच इतर राज्याचे शासकीय उपक्रम, सुक्ष्म लघु उपक्रम-औद्योगिक समुह विकास योजना (MSE-CDP) अंतर्गत मान्यताप्राप्त औद्योगिक समुहांच्या सामाईक सुविधा केंद्रांना (CFC), अवकाश संशोधनासाठी यंत्रसामुग्री बनविणारे उद्योजक, आर्थिकदृष्ट्या अविकसीत क्षेत्रातील छोटे उद्योजक तसेच शेतकरी कंपन्या, इत्यादि) | |
| | २) | **<u>माहिती तंत्रज्ञान/जैव तंत्रज्ञान उद्यानातील सर्व प्रकारचे बिल्ट-अप गाळे इत्यादिचे हस्तांतरण करणे.</u>** | | |
| | | अ) | ५०० चौ.मी. बिल्टअप एरिया गाळयांचे हस्तांतरण करणे. | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रा.अ. (आयटी) यांचेमार्फत सह मु.का.अ. यांचे मंजुरीने) |
| | | आ) | ५०१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त बिल्टअप एरिया गाळयांचे हस्तांतरण करणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रा.अ. (आयटी) व सह मु.का.अ. यांचेमार्फत मु.का.अ. यांचे मंजुरीने) |
| | ३) | **<u>व्यापारी भूखंड/व्यापारी गाळयांचे हस्तांतरण</u>** | | |
| | | अ) | ५०० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या व्यापारी भुखंडाचे आणि ५०० चौ.मी. बिल्टअप एरिया असलेल्या गाळयांचे हस्तांतरण करणे. | प्रादेशिक अधिकारी. |
| | | आ) | ५०१ ते १००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या व्यापारी भुखंडाचे आणि ५०१ ते १००० चौ.मी. बिल्टअप एरिया असलेल्या गाळयांचे हस्तांतरण करणे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| | | इ) | १००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या व्यापारी भुखंडाचे आणि १००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या बिल्टअप एरिया असलेल्या गाळयांचे हस्तांतरण करणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| | ४) | **<u>निवासी भुखंडाचे हस्तांतरण करणे.</u>** | | |
| | | अ) | ५०० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या निवासी भुखंडाचे हस्तांतरण करणे. तसेच गृहनिर्माण संस्थेतील सदनिकाचे | प्रादेशिक अधिकारी. |



midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| | | | |
|---|---|---|---|
| | | हस्तांतरण करणे. | |
| | आ) | ५०१ ते १००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या निवासी भुखंडाचे हस्तांतरण करणे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| | इ) | १००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या निवासी भुखंडाचे हस्तांतरण करणे. | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सोपविण्यात आलेल्या कार्यभारानुसार. |
| ५) | **<u>बिल्ट-अप शेड/गाळे हस्तांतरण करणे</u>** | | |
| | अ) | १,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत बिल्ट-अप शेड, तसेच १००० चौ.मी.पर्यंत बिल्ट-अप क्षेत्राचे गाळे हस्तांतरण करणे. | प्रादेशिक अधिकारी. |
| | आ) | १,००१ चौ.मी. ते २००० चौ.मी. पर्यंत क्षेत्रफळाचे बिल्ट-अप शेड हस्तांतरण करणे, तसेच १,००१ चौ.मी. ते २००० चौ.मी. पर्यंत बिल्ट-अप क्षेत्राचे गाळे हस्तांतरण करणे. | उप मुख्यकार्यकारी अधिकारी. |
| | इ) | २००१ चौ.मी. व त्यावरील क्षेत्रफळाचे बिल्ट-अप शेड हस्तांतरण करणे. तसेच २००१ चौ.मी. वरील बिल्ट-अप क्षेत्राचे गाळे हस्तांतरण करणे. | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सोपविण्यात आलेल्या कार्यभारानुसार. |
| ६) | **उत्पादनातील बदलासह शेड/ गाळा हस्तांतरणाचा प्रस्ताव मंजूर करणे.** | | माहिती तंत्रज्ञान/जैव तंत्रज्ञान उद्यानातील घटक वगळून उद्योग घटकाच्या उत्पादनात बदल होऊन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या लाल (Red) प्रवर्गातील उत्पादनात होत असल्यास अथवा लाल (Red) प्रवर्गाअंतर्गत बदल होत असल्यास, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पर्यावरण) यांचे अभिप्राय घेऊन **सह मुख्य कार्यकारी अधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी** यांच्या पुर्व मान्यतेने भूखंड हस्तांतरणाकरीता दिलेल्या अधिकाराप्रमाणे. (५.२.१ नुसार) |



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ७) | | | वाटप केलेल्या भूखंडाचे विभाजन करुन विभाजित भूखंडाचे हस्तांतर/सबलिज करणे. | मुख्य नियोजक यांचे अभिप्राय घेऊन क्षेत्रफळानुसार हस्तांतरणाठी दिलेल्या अधिकाराप्रमाणे. (५.२.१ नुसार) |
| ५.३ | <u>प्राप्त होणारे इतर प्रस्ताव.</u> | | | | |
| | १) | मोठ्या भूखंडाचे विभाजन करुन विभाजीत भूखंडाचे आणि भूखंड पाडण्यायोग्य क्षेत्रातुन भूखंडाचे आरेखन करुन आरेखित भूखंडाचे वाटप करणे. | | | |
| | | अ) | | ५,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत भुखंडाचे वाटप करणे. | प्रादेशिक अधिकारी. |
| | | आ) | | ५,००१ चौ.मी. ते १०,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भुखंडाचे वाटप करणे. | सह मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| | | इ) | | १०,००१ चौ.मी. व त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप करणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | २) | अ) | एकत्रिकरण करुन एकत्रित भूखंडाचे वाटप करणे तसेच भूखंडाचे वाटप केल्यानंतर बांधकामासाठी भूखंडाचे एकत्रिकरण करणे | | |
| | | | १) | एकत्रिकरण करावयाच्या भूखंडाच्या एकूण ४,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यत | प्रादेशिक अधिकारी. |
| | | | २) | एकत्रिकरण करावयाच्या भूखंडाच्या एकूण ४,००१ ते ८,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सोपविण्यात आलेल्या कार्यभारानुसार. |
| | | | ३) | ८,००१ चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे एकत्रिकरण करावयाचे भूखंड | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | | आ) | | मुदतवाढ आणि एकत्रिकरण करणे असा एकत्रित प्रस्ताव मंजूर करणे | वरील ५.३.२ (अ) नुसार |
| | ३) | अ) | | कंपनी अधिनियमाखाली स्थापन झालेल्या कंपनीच्या नावातील बदलाची नोंद घेणे. | भुखंड, बिल्ट-अप शेड/गाळे इत्यादिच्या हस्तांतरणाकरीता क्षेत्रफळानुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराप्रमाणे. (आवश्यकतेनुसार प्रादेशिक विधी सल्लागार/महाव्यवस्थापक (विधी) यांचे अभिप्राय घेऊन) |
| | | आ) | | भागिदारी संस्था, स्वत:ची संस्था इत्यादिच्या नावातील बदलाची नोंद घेणे. | |



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| | | | |
|---|---|---|---|
| | ४) | **सक्षम न्यायालये, डीआरटी, बँका/वित्तीय संस्था इत्यादिमार्फत झालेल्या भुखंड, शेड, गाळयांच्या हस्तांतरणाबाबत.** | भुखंड, शेड, गाळे इत्यादिच्या हस्तांतरणाकरीता क्षेत्रफळानुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार.<br>(अशा प्रकरणी प्रादेशिक अधिकाऱ्यांनी महामंडळाच्या सर्व येणे रक्कम वसूल करणेबाबत स्थानिक पॅनल वकीलांचे सहकार्याने त्वरीत संबंधित प्राधिकरणाकडे संपर्क साधून त्याप्रमाणे कार्यवाही करावी) |

वरीलप्रमाणे मुद्दा क्रमांक ५ मधील बदला व्यतिरिक्त संदर्भिय परिपत्रक क्रमांक १ मध्ये कोणताही बदल/सुधारणा करण्यात आली नाही. सर्व संबंधितांनी उपरोक्त सुधारीत धोरण, कामकाजाची विभागणी व अधिकारातील बदल इत्यादीची नोंद घ्यावी व तात्काळ प्रभावाने कार्यवाही करण्यात यावी.

(पी. वेलरासू, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुख्यालय, मुंबई
(२) मुख्य अभियंता (पुणे/छत्रपती संभाजीनगर/नागपूर)
(३) महाव्यवस्थापक (भूमी/ विधी/भूसंपादन/मा व तं /जनसंपर्क/ मबवि/डीएमआयसी/पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे/छत्रपती संभाजीनगर/ नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ, मुंबई / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

midcconsultants.in